दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २०८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२३ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या पाठपुराव्याने

# अत्याधुनिक जिल्हा माहिती भवन उभारण्यासाठी शासनाकडून तत्वत: मान्यता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**आधुनिक काळाच्या गरजेनुसार जिल्हा माहिती कार्यालयाची माहिती व तंत्रज्ञानावर आधारीत अत्याधुनिक इमारत व सुसज्ञ मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. भविष्याचा अचूक वेध घेवून दूरदृष्टी ठेवून कार्यरत असणाऱ्या माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री व रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी ही गरज ओळखली आणि त्यादृष्टीने त्या अद्ययावत जिल्हा माहिती भवन उभारण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्नशील होत्या.**

त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून जिल्हा माहिती भवन उभारण्याकरिता जागा उपलब्ध करून देणे व पुढील कार्यवाही करण्यासाठी तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचे नियोजित जिल्हा माहिती भवन विषयी असे मत आहे की, आधुनिक काळात माहिती व तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करुन विविध प्रसारमाध्यमांपर्यंत तसेच जनतेपर्यंत शासनाच्या योजनांची तसेच शासनाच्या विविध कामांची माहिती तत्परतेने पोहोचविणे, ही एक अत्यावश्यक बाब बनली आहे. जिल्हा माहिती कार्यालय नेमके हेच काम करते. त्यांच्या या कार्याला अधिक सुसूत्रता येण्यासाठी, त्यांचे कार्य अधिक गतिमान होण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन प्रसिध्दीविषयी कामकाज अधिक उत्तमरित्या होण्यासाठी त्याचबरोबर प्रसारमाध्यम प्रतिनिधींना जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून माहिती प्रसारणाच्या कामाच्या दृष्टीने अत्याधुनिक सोयी-सुविधा मिळण्यासाठी हे अद्ययावत जिल्हा माहिती भवन निश्चित उपयुक्त ठरेल.



या प्रस्तावित जिल्हा माहिती भवनामध्ये जिल्हा माहिती कार्यालय, मिनी थिएटर, मिनी स्टुडियो, माहिती व तंत्रज्ञान कक्ष, मीडिया सनियंत्रण कक्ष, प्रदर्शन दालन, विविधोपयोगी सभागृह, डिजिटल वाचनालय, प्रसारमाध्यम प्रतिनिधींकरिता अद्ययावत प्रसारमाध्यम कक्ष,आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र अशा विविध बाबी नियोजित आहेत.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या दूरदृष्टीमुळे रायगड जिल्ह्याचेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे भूषण ठरेल असे अद्ययावत जिल्हा माहिती भवन उभारण्याच्या दृष्टीने आवश्यक पुढील कार्यवाही लवकरच गतिमान होईल.

### पाण्याच्या मुद्यावरून आ.बाळाराम पाटील आक्रमक

## महाविकास आघाडीचा सिडको अभियंत्याला घेराव ; महाविकास आघाडी रस्त्यावर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीला गेल्या तीन महिन्या पासून पाण्याचा पुरवठा नियमित होत नसल्याने, वसाहतीमध्ये पाण्याची समस्या गंभीर झाली आहे. या वसाहतीला पुन्हा सुरळीत पाणी पुरवठा व्हावा या साठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी रत्यावर उतरून सिडको अभियंत्याला घेराव घालत पाण्यासाठी जाब विचारला या वेळी मोर्च्या मध्ये सहभागी झालेले शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांचा पारा चढलेला दिसून आला. आक्रमक पणा पाहता येत्या ३० ऑक्टोबर नंतर पाण्याचा पुरवठा सुरळीत होईल असे आश्वासन दिले आहे.



सिडको ने विकसित केलेल्या कामोठे वसाहतीला गेल्या तीन महिन्या पासून पाण्याच्या गंभीर समस्यांचा सामना करावा लागत आहे. एन पावसाळ्यात देखील याच समस्यांचा सामना कामोठेकराना करावा लागला होता. बाहेर पाऊस पडत असला तरी घरात नळाला पाणी येत नसल्याचे विदारक चित्र कामोठे वसाहतीमध्ये होते. नळाला पाणी येत नसल्याने अनेक रहिवाशी आणि सोसायट्यांनी सिडकोला निवेदने तक्रारी देऊन पाणी पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी रहिवाशियानी केली होती.

मात्र या निवेदन आणि तक्रारी ला केराची टोपली दखवण्याचे कमी सिडको अधिकाऱ्यांनी केले आज. या निवेदना नंतर पनवेल पंचायत समितीचे माजी उपसभापती सखाराम पाटील, कामोठे शेकाप शहर अध्यक्ष भालचंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली रहिवाहसीयांनी सिडको अभियंत्याची भेट घेऊन पाणी सुरळीत करण्याची मागणी केली होती, अश्या पद्धतीने जवळपास चार तर पाच वेळेला रहिवाशी आणि राजकीय पुढारी यांनी मोर्चे काढून कोणी पाणी देता का पाणी अशी मागणी केली होती. त्या नंतर आज शेकडो रहिवाशीयांच्या उपस्थिती मध्ये महाविकास आघाडीच्या नेत्यांनी रस्त्यावर उतरून पाण्या साठी आंदोलन केले, सकाळी ११ वाजून ३० मिनिटांनी या आंदोलनाला कामोठे सेक्टर १० शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालया पासून सुरवात झाली.

या वेळी आंदोलकानी सिडकोच्या विरोधात घोषणे बाजी देखील केले आणि पाणी आमच्या हक्कच नाही कुणाच्या बापच अश्या घोषणा देत, कामोठे सेक्टर ६ मधील पाणी विभागच्या कार्यालयाला धडक दिली. या वेळी मोर्चात सहभागी झालेल्या महिलांनी डोक्यावर हंडा ठेवून सिडकोचा निषेध व्यक्त केला या वेळी आमदार बाळाराम पाटील, शेकाप नेते काशिनाथ पाटील, काँग्रेसचे नेते आर सी घरत, राष्ट्रवादीचे नगरसेवक सतीश पाटील, माजी नगरसेवक प्रमोद भगत यासोबत शेकाप, काँग्रेस आणि राष्ट्रवादी चे कार्यकर्ते व रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी मोर्चे करांनी सिडको पाणी कार्यालयावर धडक देऊन सिडको अधिकाऱ्या सोबत चर्चा केली त्या वेळीस सिडको अधिकारी आणि मोर्चा करा मध्ये बाचा बाची देखील उडाल्याचे दिसून आले. त्या नंतर ३० तारखे पर्यत पाणी पुरवठा सुरळीत होईल असे आश्वासन दिल्या नंतर आंदोलनकर्ते शांत झाले.

## संक्षिप्त...

### राज्यात पहिली ते चौथीचेही वर्ग भरणार; लवकरच निर्णय होणार!

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या अनेक दिवसांपासून राज्यभरात कोरोनाच्या दौनंदिन रुग्णसंख्येत मोठ्या प्रमाणात घट होत आहे. याचपाश्वभूमीवर ८ वी ते १२ वीचे वर्ग सुरु झाले असून राज्यातील महाविद्यालयांनाही काही दिवसांपूर्वी कोरोनाचे नियम पाळत सुरु करण्याची परवानगी दिली. यानंतर आता राज्यात सरसकट पहिलीपासून शाळा सुरू करण्याबाबत हालचाली सुरु झाल्याची माहिती समोर आली आहे. पहिली ते चौथी शाळा सुरु करण्यासाठी शिक्षण विभागाचे अधिकारी सकारात्मक असल्याचं समोर आलं आहे. शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी आज सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबतच्या बैठक घेतली. या बैठकीत वर्षा गायकवाड यांनी राज्यातील सुरू असलेल्या शाळांबाबतचा आढावा घेतला. राज्यात शाळा सुरू होऊन ३ आठवडे झाले आहेत. या तीन आठवड्याचा अनुभव लक्षात घेता राज्यात पहिली ते चौथीच्या शाळा सुरू कराव्यात अशी भूमिका राज्यातील बहुतांश जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मांडली. जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर राज्यात सरसकट शाळा सुरु करण्याबाबत वर्षा गायकवाड यांनी लवकरच मंत्रीमंडळ आणि टास्क फोर्सबरोबरही चर्चा करणार असल्याचे सांगितले.

## सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ करीता आरडीएसओकडून वेगाचे अंतरिम प्रमाणपत्र प्रदान

### प्रवासी वाहतूक सुरू होण्याच्या दिशेने गाठला मोठा टप्पा

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील बेलापूर ते पेंधर या मार्ग क्र. १ करीता रिसर्च डिझाईन ण्ड स्टॅण्डर्ड ऑर्गनायझेशनकडून (आरडीएसओ) वेगाचे अंतरिम प्रमाणपत्र २० ऑक्टोबर २०२१ रोजी देण्यात आले. मेट्रोचे कमाल वेगाने परिचालन करण्याची मंजुरी या प्रमाणपत्राद्वारे देण्यात आली आहे. यामुळे लवकरच या मार्गावरून प्रवासी वाहतूक सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

> मेट्रो मार्ग क्र. १ वर घेण्यात येणारी ऑसिलेशन चाचणी यशस्वी ठरली असून, आरडीएसओकडून या मार्गावर धावणाऱ्या मेट्रोचे कमाल वेगाने परिचालन करण्या संदर्भातील अंतरिम प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. यामुळे प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्याच्या दिशेने मोठा टप्पा गाठण्यात आला आहे. आता प्रवासी वाहतूक कार्यान्वित करण्यासाठी सीसीआरएस मंजूरीची प्रतिक्षा आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**



सिडकोकडून नवी मुंबईतील सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत (एलिव्हेटेड) मार्ग साकारण्यात येत आहेत. यातील बेलापूर ते पेंधर हा मार्ग क्र. १ एकूण ११ कि.मी. लांबीचा असून या मार्गावर तळोजा येथे मेट्रोचे आगार आहे. भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयांतर्गत असणाऱ्या आरडीएसओ यांच्याकडून देशातील विविध रेल्वे प्रणालींमध्ये प्रमाणीकरण आणि समन्वय साधण्याची जबाबदारी असते. आरडीएसओ यांच्याकडून सदर मार्ग क्र. १ वरील पेंधर स्थानक ते सेंट्रल पार्क स्थानका दरम्यानच्या ५.१४ कि.मी. च्या अंतरावर मेट्रोची ऑसिलेशन चाचणी आणि इनर्जन्सी ब्रेक डिस्टन्स चाचणी २८ ऑगस्ट २०२१ पासून

.../२

## बेकायदेशीर व्यावसायिकांवर सिडकोची धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनी येथील मोकळ्या भूखंडावर असलेल्या व्यावसायिक व फेरीवाल्यांच्या अतिक्रमणांविरोधात सिडको अतिक्रमण विभागाच्या वतीने धडक कारवाई करण्यात आली. यावेळी त्याठिकाणी बांधण्यात आलेला ढाबा, गॅरेज, दुकाने जमीनदोस्त केली.

सिडकोचे अतिक्रमण विभागाचे अधिकारी यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आलेल्या अतिक्रमण निर्मूलन मोहीमत पोलीस पथकाच्या सहकार्याने अचानक राबविण्यात आल्याने व्यवसायिकांची चांगलीच धावपळ उडाली. येथील व्यवसायिकांना सिडको अतिक्रमण विभागाकडून कारवाईबाबत याआधी नोटिसी दिल्या होत्या. मात्र त्यानंतरही येथील अतिक्रमणे काढली नसल्याने सिडकोच्या अतिक्रमण विभागाने खांदा कॉलनी येथील देशी तडाखा हॉटेलच्या शेजारील असलेल्या भूखंडावर अतिक्रमण केलेल्या ढाबा, गॅरेज, दुकानदार, यांनी अतिक्रमण केले होते. यामुळे येथील अतिक्रमण वाढत चालल्या असलेल्याच्या त्यानुसार

.../२



## महावितरणच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

महावितरणच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीचा धक्का लागून मुरुड तालुक्यातील नांदगावमधील रुपेश सुरेश मळेकर (वय-४६) यांचा मृत्यु झाल्याची घटना नुकतीच घडली आहे.



आपल्या घरी पाळलेल्या बकऱ्यांना झाडाचा पाला आणण्यासाठी रुपेश मळेकर आपल्या मुलाबरोबर दुपारच्या दरम्यान घरापासून काही अंतरावर पाला आणण्यासाठी गेला होते.पाला काढण्यासाठी झाडावर चढून काही फांद्या तोडल्या परंतु एक फांदी अर्धवट तुटलेली झाडाची फांदी जवळून गेलेल्या उच्च दाबाच्या विज वाहिनीवर पडल्याने शॉर्टसर्कीट होऊन त्याांना विजेचा जोराचा धक्का लागून कोसळल्याने मुलांने धावत जावून आपल्या आजोबांना सांगितले. आजोबानी व नातेवाईकांनी उपचारासाठी मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात आणले आसता डॉक्टरांनी त्यांस मृत घोषीत केले.

आकस्मित मृत्यु ची नोंद मुरूड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली. पुढील तपास पोलिस निरीक्षक- परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई- परेश म्हात्रे व पोलीस हवालदार- सचिन वाणी करीत आहेत. रुपेशच्या पश्चात आईवडिल पत्नी व दोन लहान मुले असा परिवार आहे. त्याच्या अकस्मात मृत्युने गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी विद्युत प्रवाहाच्या मेन लाईनवर आलेल्या झाडाच्या फांद्या वेळीचं तोडल्या असत्या तर हा मोठा प्रसंग घडला नसता म्हणुन सर्वशी जबाबदार विद्युत मंडळाचे अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी भरपाई दिलीच पाहिजे अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.

याबाबत मुरुड येथील वीज मंडळ अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि, सदरील घटना स्थळाची पाहणी पेण येथील वीज सहाय्यक करणार आहेत. त्यांनी तपासणी केल्यावर त्यांचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर झाल्यावर नुकसान भरपाई रक्कम मिळण्यास सहाय्यभूत ठरणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले आहे.

### शेतकऱ्यांना मोबदला देण्यात टाळाटाळ करणाऱ्या सिडकोला न्यायालयाचा दणका

## न्यायालयाच्या आदेशानंतर उरण मेट्रो सेंटरच्या कार्यालयीन मालमत्ता जप्तीची नोटीस

**दै.रायगड नगरी । उरण**

न्यायालयाच्या आदेशानंतरही प्रकल्पग्रस्त उरणमधील तीन शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाईची सुमारे सव्वा कोटीची रक्कम देण्यात दिरंगाई करणाऱ्या सिडकोला अलिबाग न्यायालयाने वसुलीसाठी उरण मेट्रो सेंटरच्या कार्यालयीन मालमत्ता जप्तीची नोटीस बजावली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर बेलिफ, शेतकरी आणि वकिलांच्या फौजफाट्यासह आलेल्यांना उरण मेट्रोसेंटरने पैसै जमा करण्यासाठी एक महिन्याची मुदत मागितली आहे.




सिडकोच्या साडेबारा टक्के भुखंडाच्या वाढीव नुकसानीची रक्कम उरणच्या तीन शेतकऱ्यांना अदा करण्याचे आदेश न्यायालयाने २०१९ रोजी दिले होते. मात्र तीन वर्षांच्या कालावधीतही सिडकोने शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम देण्यात चालढकलपणा चालविला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतरही सिडकोकडून उरणच्या शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम देण्यात आली नसल्याने

.../२

## अबुधाबी येथे नोकरीला लावण्याचे अमिष दाखवून 30 बेरोजगार तरुणांची फसवणूक

### अस्तित्वात नसलेल्या कंपनीचे ऑफर लेटर देऊन ५५ लाखाची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुबई, अबुधाबी येथील कंपनीमध्ये हेल्पर म्हणून कामाला लावण्याच्या बहाण्याने एका भामटय़ाने केरळ राज्यातील ३० बेरोजगार तरुणांकडून सुमारे ५५ लाख रुपये उकळून सदर बेरोजगार तरुणांना अस्तित्वात नसलेल्या कंपनीचे ऑफर लेटर देऊन त्यांना अबुधाबी येथे पाठवुन त्यांची फसवणुक केल्याचे उघडकिस आले आहे. महेश शेवती असे या भामटय़ाचे नाव असून नेरुळ पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकिसह विश्वासघात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेला आरोपी महेश शेवती याने २०१९ मध्ये सीवूड्स सेक्टर-२५ मधील सिवूड्स कॉर्नर या इमारतीत आर.एम.मेरिटाईम सर्व्हीसेस प्रा.लि.या नावाने कार्यालय थाटले होते. तसेच आखाती देशामध्ये क्रुड ऑईल पाईपिंग, ड्रिलिंग व रिग (ऑनशोर व ऑफशोर) च्या कामासाठी मुले पाठविण्याचे काम करत असल्याची जाहिरातबाजी केली होती. त्यावेळी कामाच्या शोधात असलेल्या केरळ येथील सहाजुद्दीन हनिफा (३६) याने मित्राच्या मदतीने सीवूड्स येथे येऊन आरोपी महेश शेवती याची भेट घेतली होती. त्यावेळी महेश शेवती याने अबुधाबी येथील अडनक ऑईल ऍन्ड गॅस कंपनीसाठी रस्टाबोट-हेल्पर म्हणून ५० जणांची व्हॅकेन्सी असल्याचे त्याला सांगितले होते. तसेच सदर कामासाठी ३ लाख रुपये कमिशनच्या स्वरुपात त्याच्याकडे मागितले. होते.

.../२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेत जमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा मालकी, वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे –

**मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड, तलाठी सजा–महोदर हद्दीतील**

| मालकाचे नाव | गट/भूमापन क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | भोगवटदार वर्ग–१ |
|---|---|---|---|---|
| १) नाना जयराम आगलावे<br>२) गुलाब जयराम आगलावे<br>३) बेबीबाई रामचंद्र खानावकर | ९५/१ | १–०२–४०<br>पो.ख.०–०७–६०<br>एकूण १–१०–०० | १३–०६<br><br>३–९४ | |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला असून वरील मिळकतींवर अन्य कोणाचा, दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कब्जा वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझिशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटुंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्यास गेल्यास सदरच्या वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,

दि.२३/१०/२०२१

ठिकाण : कळंबोली

**सही/–**
**ॲड.सुनील एन. मोरे**
**ऑफिस नं.३०६०, सी–विंग, बिमा कॉम्प्लेक्स प्रिमायसेस, प्लॉट नं.११९, सेक्टर–केडब्ल्यूसी, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८**
**मो.८३६९४६५७९९/९९२०४५५७२७**

---

अर्जदाराचे वकील : ॲड.अपर्णा कुलकर्णी / ॲड.जयश्री कुलकर्णी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६६०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१२/२०२१

श्री.राजेश बाळासाहेब काळे
वय : ५० वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.प्लॉट नं.१४, रोड नं.१८,
बी.एस.एन.एल.ऑफिस जवळ, सेक्टर १२,
सिडको कॉलनी, न्यू पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांच्या आई कै.यामिनी बाळासाहेब काळे प्लॉट नं.१४, रोड नं.१८, बी.एस.एन.एल. ऑफिस जवळ, सेक्टर १२, सिडको कॉलनी न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी होत्या. त्यांनी दि.२७/०८/२०२० रोजी मृत्यूपत्र केले आहे. त्याचा रजिस्टर क्रमांक प.व.ल.१–३९५७/२०२० असा आहे. कै.यामिनी बाळासाहेब काळे यांचे २६/११/२०२० रोजी निधन झाले आहे. सदर मृत्यूपत्र विल प्रोबेट साठी अर्जदार यांनी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**प्लॉट नं.१४, रोड नं.१८, बी.एस.एन.एल. ऑफिस जवळ, सेक्टर १२, सिडको कॉलनी, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.यामिनी बाळासाहेब काळे यांच्या मृत्यूपश्चात त्यांस मृत्यूपत्रानुसार अर्जदार हे वारस आहेत. सबब अर्जदार यांनी विल प्रोबेट करिता अर्ज केला आहे. सदर अर्जदार व्यतिरिक्त कै.यामिनी बाळासाहेब काळे यांना इतर कोणीही वारस नाहीत. सदर मिळकतीमध्ये कोणालाही वारस हक्क सांगायचा असेल अथवा कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून नेमली तारीख १८ डिसेंबर २०२१ पूर्वी स्वतः अगर वकीलांमार्फत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती व तक्रारी न आल्यास मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत कायद्यानुसार चालणेस पात्र राहणार नाही आणि सदर मुळच्या अर्जाप्रमाणे न्यायालय न्याय निर्णय करेल. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

आज दि.२२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) श्रीमती.सरिता जयवंत २) श्री.सुमित जयवंत पाटील, ३) श्री.सुरज जयवंत पाटील सर्व रा.वाघिवली वाडा, ता.पनवेल, जि.रायगड यांची ग्रामपंचायत ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हद्दीतील वाघिवली वाडा गावात असलेली घर मिळकत नवी मुंबई प्रकल्पांतर्गत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामांसाठी संपादीत झाल्यामुळे सदर संपादनाचे मोबदल्यात पुनर्वसन व पुनःस्थापनेंतर्गत खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिलांना सिडकोने वाटपीत केलेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

**नोड : पुष्पक (वडघर), ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| ६१ | आर–५ | १९० |

येणेप्रमाणे भूखंडाचे वर्णन असून ज्याचा उल्लेखत यात यापुढे सदरहू भूखंड असा केला आहे.

सदरहू भूखंड विकसित करण्याचा करारनामा माझे अशिल आणि मे.अथर्व डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.मयुर गंगाधर शेटे, २) श्री.विनायक दगडू पाटील यांच्यात झालेला आहे. परंतु, सदर कराराप्रमाणे मे.अथर्व डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.मयुर गंगाधर शेटे, २) श्री.विनायक दगडू पाटील यांनी वागणूक न करता कराराचे भंग केले असल्यामुळे माझे अशिलांनी त्यांना विनिर्दिष्ट दिलासा अधिनियम १९६३ चे कलम २० च्या तरतुदीनुसार कराराच्या पर्यायी पालनाची कार्यवाही संबंधी दि.१३/०७/२०२१ रोजीची कायदेशीर नोटीस दिली होती. त्या नोटीशीतील मागणीनुसार विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित कार्यवाही करण्यास त्यांनी कसूर केलेली आहे.

तरी, माझे अशिल कायद्यानुसार सदर कराराचे पर्यायी पालन स्वतः अथवा अन्य त्रयस्थ व्यक्तींमार्फत करून घेतील याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : २२/१०/२०२१

**सही/–**
**ॲड.राहूल दत्तात्रेय मोकल**
**मु.पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**

---

## जाहीर नोटीस

उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

On Admission
आरटीएस अपिल क्र. /२०२१

१) श्री.अनिल दत्तात्रय वाणी
रा.मुक्काम प्लॉट नं.३४, पांडुरंग कृपा,
सहकारी सोसायटी, ता.पनवेल, जि.रायगड — वादी

विरुद्ध

१) श्री.दिनेश त्रिलोकनंद चौधरी
रा.दारुखाना, शिवरी, डायरेक्टर, त्रिलोक, शिप ब्रेकर्स मुंबई
२) अंकुश धर्मा शेळके ३) फसुबाई उंदऱ्या काथारा
४) बनुबाई सावळाराम पाटील ५) बारकूबाई सोमवार भगत
६) मनुबाई जोमा पालेकर ७) महादेव धर्मा शेळके
८) रवींद्र धर्मा शेळके ९) लीला धर्मा शेळके
सर्व रा.मुक्काम, आदई, ता.पनवेल, जि.रायगड — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.२५३६ व ३७४४ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलांची पुढील सुनावणी ही दि.०८/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे : आदई, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ८६ | ३ | ०.२२.६<br>पो.ख. ०.०२.०० | ५.६२ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल

दिनांक : २०/१०/२०२१

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

---

# मतदारयादीचा विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम घोषित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय निवडणूक आयोगाने दि. १ जानेवारी २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदारयादीचा विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. आयोगाच्या निर्देशानुसार दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत मतदार नोंदणीसंदर्भात विशेष मोहिमांचा कालावधी निश्चित करण्यात आला असून त्यानुसार या कार्यक्रमाचे सविस्तर वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे– पुनर्रिक्षण उपक्रम:– १. एकत्रीकृत प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणे– दि. १ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) रोजी, २. दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी– दि. १ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) ते दि. ३० नोव्हेंबर, २०२१ (मंगळवार), ३. विशेष मोहिमेचा कालावधी– १) दि. १३ नोव्हेंबर, २०२१ (शनिवार) व दि. १४ नोव्हेंबर २०२१ (रविवार), २) दि.२७ नोव्हेंबर, २०२१ (शनिवार) व दि. २८ नोव्हेंबर, २०२१ (रविवार), ४. दावे व हरकती निकालात काढणे– दि. २० डिसेंबर, २०२१ (सोमवार) पर्यंत, ५. मतदार यादी अंतिम प्रसिध्दी करणे– दि. ०५ जानेवारी, २०२२ (बुधवार). सर्व मतदारांनी तसेच राजकीय पक्षांनीही या विशेष मोहिमेची नोंद घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती. स्नेहा उबाळे यांनी केले आहे.

---

मे.मुजावर साहेब

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१५०२/२०२१
नि.नं.८
ने.ता.१५/१२/२०२१

१) श्री.विश्वनाथ सोमा ठाकूर
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.मच्छिंद्र सोमा ठाकूर
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
१ व २ दोघेही रा.घोडबंदर गाव, किल्ला रोड,
एमटीडीसी बंगल्या जवळ, मीरा–भाईंदर, ठाणे–४०११०७
३) श्रीमती.पद्मुबाई लक्ष्मण पाटील
वय : ७३ वर्षे, धंदा : घरकाम
रा.मु.पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ व २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ असून अर्जदार क्र.३ ही त्यांची सख्खी विवाहित बहिण आहे. अर्जदारांचे वडील सोमा भोका ठाकूर हे दि.१४/१०/१९८५ रोजी मौजे : जासई, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत. सदर मयत सोमा भोका ठाकूर यांच्या सामाईक मालकीच्या मौजे : न्हावे, ता.पनवेल येथील जमीन मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतीच्या संपादनासंबांधी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**

**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | न्हावे–४६६ | अ | १४७ | ०–२९.०० | १–७५ |
| २ | न्हावे–३१३ | अ | ६५८ | ०–४६.० | २–०० |
| ३ | न्हावे–४६६ | अ | ६९१ | ०–२२.८ | १–२५ |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत सोमा भोका ठाकूर यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत सोमा भोका ठाकूर यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२२ माहे १० सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

ॲड.प्रिती जगदीश भारती

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

CMA १३५२/२०२१
नि.नं.८
ने.ता.०१/१२/२०२१

१) श्री.इंद्रजित सिंह संधू
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्रीमती.भगवंत कौर संधू
वय : ६७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
अर्जदार क्र.१ व २ रा.४ बी–३०४,
सिलवार स्टार, प्लॉट नं.५०/६३/६५,
गोकुळ डेरी जवळ, सेक्टर १८, कामोठे
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
३) सौ.अमनदीप कौर प्रदीप सिंह खाघ
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.सदनिका क्र.बी/१००५, सिलवर क्रेस्ट (गेओमेत्रीक्ष देव),
प्लॉट नं.२९, सेक्टर २५, प्लॉट नं.२२, कामोठे,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ३ यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात कै.गुरमीत सिंह संधू यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. कै.गुरमीत सिंह संधू यांचा मृत्यू दि.०१/०७/२०२१ रोजी बी–३०४, सिलव्हर स्टार, प्लॉट नं.५०/६३/६५, गोकुळ डेरी जवळ, सेक्टर १८, कामोठे, पनवेल येथे राहत्या घरी झालेला आहे. कै.गुरमीत सिंह संधू हे हयातीत असताना कै.गुरमीत सिंह संधू यांनी दि.०६/०१/२०१८ रोजी सॅनवो रिसॉर्ट प्रायव्हेट लिमिटेड यांचे वतीने कुलमुखत्यार म्हणून श्री.जिनेंद्र दुर्गे यांच्याकडून रजिस्टर करारनामाने मॅरेथॉन नेक्सझोन ॲन्टेलिया या इमारतीमधील सातव्या मजल्यावरील फ्लॅट नं.७०७, एस ३, बी विंग, पळस्पे फाट्याजवळ, एन एच हायवे ४ बी, कोळखे, पनवेल ४१०२०६, क्षेत्रफळ ६१.०९ चौ.मी. कारपेट व बाल्कनी क्षेत्रफळ ७.८५ चौ.मी. कारपेट रेंश (प्रमाणे) सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा अनु क्र.१५९/२०१८ कडे मा.दुय्यम निबंधक पनवेल ३ यांच्या कार्यालयात दि.०६/०१/२०१८ रोजी नोंदविलेला आहे. सदर मिळकतीवर वारस म्हणून नोंद घेण्याकरिता अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारसा हक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारसा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या हरकती या योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकत न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून अर्जदारास वारस दाखला देण्यात येईल. मागाहून आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

आज दि.२२ माहे १०/२०२१ आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी मौजे : पळसदरी, ता.कर्जत, जिल्हा : रायगड येथील खालील तपशिलवारपणे नमूद केलेल्या मिळकती संबंधित मिळकतींचे मालक श्री.प्रवीण विठ्ठल भोसले यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाचा व्यवहार संदर्भित मिळकतींचे विद्यमान माालक व माझे अशिलांचे दरम्यान झाला आहे.

संदर्भित मिळकती पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउप्परही सदर मिळकतीत अथवा त्यापैकी कोणत्याही भागात अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार, वापर, वहिवाट, कब्जा, गहाण, दान, करार–मदार, पोटगीचा हक्क व इतर हक्क असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत तशी लेखी हरकत माझ्याकडे कागदोपत्री पुराव्यानिशी नोंदवून माझी खात्री पटवून द्यावी.

विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पळसदरी, ता.कर्जत, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | २५ | ३ | ०–१५–००<br>पो.ख.०–०२–००<br>०–१७–०० | ०.१२ |

**पत्ता : शॉप नं.७, योगेश्वर कृपा को.ऑप.हौ. सो., चिंतामणी हॉलसमोर, जुना ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**फोन नं.९९७५५४७२५०/९९३०८८८४०८**

**सही/–**
**सौ.अमृता अशोक नाईक**
**(ॲडव्होकेट व नोटरी)**

---

श्री.भाकरे साो.कोर्ट

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.योगेंद्र दुबे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.११४८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/१०/२०२१

श्री.वीरेंद्र कुमार व इतर ३
वय : ७५ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.५/१९, १–३, वृंदावन अपार्टमेंट,
सेक्टर ५, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आाहे की, मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कै. अंबुजा सिंग यांचे प्रत्यक्ष मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीतील मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : खारघर येथील फ्लॅट नं.डी.१०–११, दुसरा मजला, श्रीराम गृहनिर्माण संस्था मर्या, क्षेत्र ७२३.६ चौ.फूट, प्लॉट नं.३९, सेक्टर–५, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.अंबुजा सिंग यांचे दि.१२/०८/२०२० रोजी सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने/नी आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.२१ माहे १० सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

ॲड.अमित सपकाळ

## जाहीर नोटीस

CMA १४०७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/१२/२०२१

१) सुवर्णा मधुकर लोखंडे
वय वर्षे : ५६, व्यवसाय : घरकाम
रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), जि.रायगड
२) सारिका प्रवीण धस्के
वय वर्षे : ३६, व्यवसाय : घरकाम
रा.निकाळजे प्लॉट नं.७, अजगर साळून,
सिद्धार्थ कॉलनी, चेंबूर (पू), मुंबई
३) पुष्पा मधुकर लोखंडे
वय वर्षे : ३४, व्यवसाय : नोकरी
रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), जि.रायगड
४) प्रफुल्ल मधुकर लोखंडे
वय वर्षे : २७, व्यवसाय : नोकरी
रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार अनुक्रमे २, ३, ४ आणि ५ यांचे वडील कै.मधुकर श्रीपती लोखंडे हे दि.०५/०७/२०२१ रोजी क्रिटीकेअर हॉस्पिटल, कामोठे, पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ यांचे सासरे व अर्जदार अनुक्रमे २, ३, ४ आणि ५ यांचे आजोबा कै.श्रीपती तातू लोखंडे हे दि.१५/१२/२००७ रोजी मु.पो.राहुडे, ता.पाटण, जि.सातारा येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ यांची सासूबाई व अर्जदार अनुक्रमे २, ३, ४ आणि ५ यांची आजी कै.मुक्ताबाई श्रीपती लोखंडे हे दि.२७/०४/२०१० रोजी मु.पो.राहुडे, ता.पाटण, जि.सातारा येथे मयत झालेले आहेत. कै.मधुकर श्रीपती लोखंडे यांच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :–

**रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), जि.रायगड ४१०२०६**
**२६.११ चौ.मी. चटई क्षेत्र**

येणेप्रमाणे फ्लॅट मिळकतीचे वर्णन असून सदरहू फ्लॅट मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदाराने मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.मधुकर श्रीपती लोखंडे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आवश्यक कागदोपत्री पुराव्यासहीत मे.कोर्टात दाखल करावे. सदर मदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मे.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आरडीएसओकडून वेगाचे अंतरिम प्रमाणपत्र प्रदान

घेण्यास सुरुवात झाली. प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्याच्या दृष्टीने चाचपणी म्हणून ऑसिलेशन चाचणी अत्यंत महत्त्वाची ठरते. या दरम्यान वेगवेगळ्या वजनाचा भार वाहून नेण्याची मेट्रोची क्षमता आणि इमर्जन्सी ब्रेक यांची चाचणी घेण्यात आली. तसेच सिडकोकडून रोलिंग स्टॉक, सिग्नलिंग, विद्युत पुरवठा, मार्गिका इ. मेट्रोतील प्रणालींशी संबंधित कागदपत्रे, चाचणी प्रमाणपत्रे आरडीएसओला सादर करण्यात येऊन, कागदपत्रांची आरडीएसओकडून पडताळणी करण्यात आली. ऑसिलेशन चाचणी यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर मार्ग क्र. १ वर कमाल वेगाने मेट्रोचे परिचालन करण्याकरिता आरडीएसओकडून वेगाचे अंतरिम प्रमाणपत्र देण्यात आले आहे. यानंतर लवकरच आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएमआरएस) यांच्याकडून परीक्षण करण्यात येईल व तद्नंतर रेल्वे मंडळाची मंजुरी प्राप्त करून मार्ग क्र. १ वर पेंधर ते सेंट्रल पार्क स्थानकांदरम्यान प्रत्यक्ष प्रवासी वाहतुकीला सुरुवात होईल.

## बेकायदेशीर व्यावसायिकांवर सिडकोची धडक कारवाई

सिडकोच्या अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम आणि फुटपाथवरील अतिक्रमणांकडे मोर्चा वळविला आहे. या मोहिमेत चार विभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते. यांच्यासह जेसीबी, ट्रक, पोलीस पथक सहभागी झाले होते.

## न्यायालयाच्या आदेशानंतर उरण मेट्रो सेंटरच्या कार्यालयीन मालमत्ता जप्तीची नोटीस

संतप्त झालेल्या जयंत नारायण तांडेल रा.करळ – उरण यांच्यासह अन्य दोन शेतकऱ्यांनी सुमारे तीन कोटी १५ लाखांहून अधिक रकमेच्या वसुलीसाठी अलिबाग न्यायालयात धाव घेतली होती. अलिबाग सहा दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश सो.द.घनवट यांनी शेतकऱ्यांच्या वाढीव नुकसानीची रक्कम वसुलीसाठी सिडकोच्या उरण मेट्रो सेंटरमधील कार्यालयीन सामान जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. काल अलिबाग न्यायालयाचे बेलिफ सागर शिंदे, वकील ॲड.सुशांत घरत, ॲड.रत्नदीप पाटील, ॲड. प्रशांत कडव यांच्यासह उरण मेट्रो सेंटरच्या कार्यालयीन सामानाची जप्तीची कारवाई साठी नोटीस बजावण्यासाठी पोहचले होते. कार्यालयीन मालमत्तेची जप्तीची नोटीस बजावण्यासाठी फौजफाट्यासह पोहचल्यानंतर उरण मेट्रो सेंटरने शेतकऱ्यांना वाढीव नुकसानीची रक्कम लवकरात लवकर जमा करणार आहोत. तशी लेखी हमीपत्र देण्यात आले आहे.

## ३० बेरोजगार तरुणांची फसवणूक

सहाजुद्दीन हनिफा याने ५० मुले कामासाठी आणून दिल्यास त्याच्याकडून कमिशनची रक्कम घेणार नसल्याचे महेश शेवती याने सहाजुद्दीन हनिफाला सांगितले. तसेच प्रत्येक मुलाच्या नोकरीसाठी २ लाख रुपये लागतील असे देखील त्याने सांगितले. त्यानंतर सहाजुद्दीन हनिफा याने केरळ येथे जाऊन त्याच्या ओळखीतल्या सतीश कुमार याच्या माध्यमातून नोकरीची गरज असलेल्या २९ बेरोजगार मुलांची जुळवाजुळव करुन त्यांना सीवूड्स येथे महेश शेवती याची भेट करुन दिली होती. त्यावेळी भामट्या महेश शेवती याने अबुधाबी येथे ५६ दिवसांचे काम असेल व २८ दिवसांची सुट्टी असेल व महिन्याला ५० हजार रुपये पगार असेल असे बेरोजगार तरुणांना सांगितले होते. तसेच सदर ठिकाणी काम करण्यासाठी वर्क परमिट व्हिसा, विमान प्रवास भाडे, आबुधाबी येथील ट्रेनिंग यासाठी त्याला प्रत्येकी २ लाख रुपये द्यावे लागतील असे सांगितले होते. त्यावेळी सहाजुद्दीन हनिफा याने महेश शेवतीला याला त्याच्या कामाचे २ लाख ७५ हजार रुपये दिले होते. काही महिन्यानंतर त्याने २९ बेरोजगार तरुणांकडून प्रत्येकी २ लाख रुपये जमवून ती रक्कम देखील महेश शेवती याला दिली होती. काही दिवसानंतर भामट्या महेश शेवते याने मुहम्मद ईर्शाद रफिक टेक्निकल सर्व्हीसेस एलएलसी, दुबई या कंपनीच्या लेटरहेडवर २९ बेरोजगार तरुणांना जॉब कन्फर्मेशन झाल्याचे पत्र व्हॉट्सऍपद्वारे सहाजुद्दीन हनिफा याला पाठवुन दिल्यानंतर भामट्या महेश शेवती याने मे २०१९ मध्ये २९ बेरोजगार तरुणांना अबुधाबी येथे पाठवुन दिले होते. मात्र त्याठिकाणी मुहम्मद ईर्शाद रफिक टेक्निकल सर्व्हीसेस या नावाची कंपनीच अस्तित्वात नसल्याचे सदर तरुणांच्या लक्षात आले. ही बाब भामट्या महेश शेवती याला सांगितल्यानंतर त्याने दुसऱया कंपनीत त्यांना कामाला लावण्याचे आश्वासन दिले. मात्र त्याने सदर तरुणांना दुसरीकडे कुठेच कामाला न लावल्याने तसेच व्हिजीट विसाची मुदत संपत आल्याने अखेर त्या तरुणांनी जुनमध्ये केरळ गाठले. त्यानंतर सदर तरुणांनी सीवूड्स येथील भामट्या महेश शेवती याचे कार्यालय गाठून त्याला जाब विचारला. त्यावेळी भामट्या महेश शेवती याने त्यांना दुसऱ्या कंपनीत कामाला लावण्याचे आश्वासन देऊन वेळ मारुन नेली. मात्र त्याने सदर तरुणांना कुठेच कामाला न लावल्याने सदर तरुणांनी आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. त्यानंतर भामट्या महेश शेवती याने मागील दोन वर्षापासून पैसे देण्यास टाळाटाळ केल्याने अखेर फसवणुक झालेल्या या ३० तरुणांनी नेरुळ पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## १०० कोटी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणाचा टप्पा पूर्ण; विद्यार्थ्यांची मानवरुपी साखळी करून अभिनंदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारताचे यशस्वी पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली भारताने १०० कोटी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणाचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे मंडळ तसेच सुषमा पाटील विद्यालय कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने दि २२-१०-२०२१ रोजी सुषमा पाटील विद्यालय येथे विद्यार्थ्यांची मानवरुपी साखळी करून अभिनंदन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .या कार्यक्रमासाठी नगरसेवक दिलीप पाटील, नगरसेवक डॉ अरुणकुमार भगत, नगरसेवक विजय चिपळेकर, युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, व्यापारी आघाडी अध्यक्ष नाना मगदूम, कैलास सरगर, आध्यात्मिक सेल संयोजक विनोद खेडकर, उत्तम जाधव, महिला मोर्चा उपाध्यक्षा सुरेखा लांडे, कल्पना जाधव, सुरेंद्र हल्लीकर आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालीत वाहतूक कोंडीचे विघ्न ; बाह्यवळण मार्गाला मुहूर्त मिळेना?

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत वाहतूक कोंडीची समस्या बिकट झाली आहे. त्यातच मागील अनेक वर्षे येथील बलाप येथून जाणारा बाह्यवळण मार्ग प्रलंबित आहे. परिणामी प्रवासी, वाहनचालक व नागरिकांची गैरसोय होत आहे.





अष्टविनायक तीर्थक्षेत्र असल्याने नेहमीच येथे भाविकांची गर्दी असते. पाली हे तालुक्याचे ठिकाण आहे. परिणामी अनेक लोक कामानिमित्त येत असतात. पालीतील अंतर्गत रस्ते अरुंद आहेत. बल्लाळेश्वर मंदिर, ग.बा. वडेर हायस्कूल, जुने एस.टी.स्टँड, गांधी चौक, बाजारपेठ, मारुती मंदिर अशा अनेक ठीकाणी नियमित वाहतूक कोंडी होते. हि वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी काही नाक्यावर वाहतुक पोलीस तैनात असुन देखिल अरुंद रस्ते, अवजड वा- हतूक, एकेरी वाहतुकीवरुन दुहेरी वाहतुक आणि वाहनचालकांनी वाहतुकिचे नियम न पाळल्याने व रस्त्याच्या दुतर्फा अवैध्यरित्या पार्क केलेली वाहने यांमुळे पोलीसांना या वाहतुक कोंडीवर नियंत्रण मिळविणे अवघड होते. अनेक वेळा वाहतुक कोंडीमुळे रुग्णांना तसेच रुग्णवाहिकेस रुग्णालयात पोहचण्यास उशिर होतो. संध्याकाळ नंतर मात्र बऱ्याच वेळा वाहतुक पोलीस तैनात नसतात. तर अनेक महत्त्वाच्या ठिकाणी ते नसतात. आणि यावेळी सुद्धा बर्याचवेळा वाहतुक कोंडी होते. आणि कोंडीचा प्रश्न गंभीर बनतो.

वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गावर बलाप गावावरुन थेट बल्लाळेश्वर मंदिराच्या पाठीमागे झाप गावाजवळ हा बाह्यवळण मार्ग काढण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाची मंजुरी देखिल मिळाली आहे. जमीन संपादन देखील झाली आहे. परंतू हा पर्यायी मार्ग अजूनही लालफितीत अडकला आहे.

मुंबई गोवा महामार्गाचे संथ गतीने सुरु असलेले व अपुर्ण काम यामुळे येथे वाहतुक कोंडी होते. त्यामुळे मुंबई वरुन कोकणाकडे जाणारे प्रवासी पालीतून विळेमार्गे माणगाववरुन किंवा वाकणवरूण पुढे जातात. तर कोकणाकडून येणारी वाहने माणगाववरुन विळे मार्गे पालीतून खोपोलीमार्गे पुणे-मुंबईकडे जातात. परिणामी पालीत वाहनांची रेलचेल वाढून अधिक वाहतूक कोंडी होते. बाह्यवळण मार्ग निर्माण झाल्यास हि वाहणे पालीच्या बाहेरूनच निघून जातील त्यामुळे हि वाहतूक सुरळीत होऊ शकते.

बाह्यवळण मार्गाला मंजुरी मिळाली आहे. जमीन अधिग्रहणाबाबत प्राथमिक नोटीसा दिल्या आहेत. यासाठी जमिनी अधिग्रहण करण्यासाठी व इतर कामांसाठी दहा कोटी रुपये देखील मंजुर झाले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने खाजगी एजन्सीद्वारे मार्गाचा प्लॅन फायनल केला आहे. त्यानुसार रायगड जिल्हाधिकार्यांनी त्यास मान्यता देवून प्रांत अधिकार्यांना जमिन अधिग्रहनाच्या सुचना दिल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभाग (महा. शासन), महसुल विभाग व नगररचना विभाग या तीन विभागांची एकत्रीत बैठक झाली आहे. मात्र या संदर्भात अजून पुढे काय झाले या बाबत काही अद्ययावत माहिती नाही.

# अंगठी सोन्याची आहे कि नाही तपासणीच्या नावाने केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरातील एका रिक्षा चालकाची रिक्षा बसलेल्या प्रवाश्याने माझ्याकडे सोने तपासणी करण्याचे मशीन आहे. असे सांगून त्या रिक्षा चालकाच्या हातात असलेली ३५,०००/- रुपये किमतीची सोन्याची अंगठी घेऊन पसार झाला. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून खारघर पोलीस त्या भामट्याचा शोध घेत आहेत.

दशरथ लक्ष्मण कांबळे (वय ५६ वर्षे) राहणार खारघर सेक्टर १४ येथे राहत असून रिक्षा व्यवसायावर कुटुंबाचा उदरनिर्वाह आहे. तसेच त्यांची रिक्षा एमएच ४३ बीएफ २६२८ ही आहे. या रिक्षाद्वारे खारघर परिसरातील उत्पन्न मिळवीत आहेत. यावेळी कांबळे हे खारघर परिसरातून एक प्रवासी घेऊन सीबीडी बेलापूर येथील सिडको कार्याच्या बाजूला त्या प्रवाश्याला सोडून दिले. त्याचबरोबर कांबळे हे दुसऱ्या प्रवाश्याची वाट बघत थांबले होते. काही वेळाने त्याठिकाणी एक प्रवासी आला. व रिक्षात बसून खारघर कोपरा येथे जायाचे असे कांबळे यांना सांगितले. व खारघर कोपरा येताच त्या भामट्याने कांबळे यांना सांगितले कि माझ्याकडे सोने असली आहे कि नकली हे तपासणीचे मशीन आहे. सुरुवातीला त्या रिक्षा चालकांचे विश्वास संपादन केले. मशीनमध्ये तपासणीसाठी कांबळे यांच्या बोटात असलेली अंदाजे ३५,००० /- रुपये किंमतीची सोन्याची अंगठी घेऊन गेला व तो भामटा परत आलाच नाही. याबाबत रिक्षा चालकाने खारघर पोलीस ठाण्यात घडलेल्या घटनेची माहिती दिली. व पोलिसांनी गुन्हा दाखल होताच पुढील शोध सुरु केला आहे.

---

श्री.भाकरे साो.कोर्ट

अर्जदाराचे वकील श्री.विकास एस.पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१४६५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१२/२०२१

श्री.जयेश मारुती कोळी
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.समर्थ नगर, हनुमान मंदिराजवळ,
रामवाडी, ता.पेण, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.आदितवार अंबाजी कोळी उर्फ फडकर यांचा मयत मुलगा कै.नामदेव आदितवार कोळी उर्फ फडकर यांचा नातू आहे. अर्जदार यांची आई कै.उषा मारुती कोळी उर्फ फडकर रा.रामवाडी, समर्थ नगर, पेण, ता.पेण, जि.रायगड ह्या दि.०९/०५/२०२१ रोजी धावटे कोविड सेंटर, ता.पेण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.उषा मारुती कोळी उर्फ फडकर यांचे पती कै.मारुती हिरा कोळी हे दि.२५/०८/२००९ रोजी रामवाडी, पेण येथे मयत झाले आहेत. कै.नामदेव आदितवार कोळी उर्फ फडकर व कै.आदितवार अंबाजी कोळी उर्फ फडकर यांच्या मिळकती ह्या महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| गव्हाण | १६ | १२ | ४ | 0-0३-५ |
| | | ४0९ | २ | 0-४0-१ |
| गव्हाण | १६ | २२ | १६ | 0-२६-१ |
| | | १५ | ४ | 0-0५-६ |

वरील अर्जदार हे कै.उषा मारुती कोळी उर्फ फडकर यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.उषा मारुती कोळी उर्फ फडकर यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

राव साहेब

प्रो.जमा. ६-२५ — अर्जदाराचे वकील : ॲड.सचिन केणी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सि.डी./ज्यु.डी.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४३७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१/१२/२०२१

कै.बाळाराम देहू म्हात्रे (मयत तर्फे वारस)
१) श्री.नामदेव बाळाराम म्हात्रे
वय : ६६ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.सुरेश बाळाराम म्हात्रे
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
३) श्री.गणेश बाळाराम म्हात्रे
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.हरिश्चंद्र बाळाराम म्हात्रे
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.दशरथ बाळाराम म्हात्रे
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
६) श्री.अशोक बाळाराम म्हात्रे
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
७) कै.अविनाश बाळाराम म्हात्रे मयत तर्फे वारस
७/१) श्रीमती.दिपाली अविनाश म्हात्रे
वय : ३३ वर्षे, धंदा : घरकाम
७/२) तर्फे अज्ञान पालनकर्ता म्हणून
श्रीमती.दिपाली अविनाश म्हात्रे
७/२) कु.सार्थकी अविनाश म्हात्रे
वय : ९ वर्षे, धंदा : शिक्षण
वरील सर्व रा.काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड
८) सौ.मीराबाई दयाराम भगत
वय : ६२ वर्षे, धंदा : घरकाम
रा.अशोक बाग झोपडपट्टी, प्रतापनगर समोर,
अमरधाम रोड, पनवेल, जि.रायगड
९) सौ.माणिक शंकर म्हात्रे
वय : ५६ वर्षे, धंदा : घरकाम
रा.E-221, AR-1, सिडको कॉलनी, सेक्टर ०३,
नवी मुंबई, ऐरोली मोड, ४००७०८ — अर्जदार

ज्याअर्थी कै.बाळाराम देहू म्हात्रे हे दि.२३/१०/२०२० रोजी मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | भूखंड क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | दर प्रति चौ.मी. |
|---|---|---|---|
| काळुंद्रे | १७१ | ५०० चौ.मी. | १६.२० |

कै.बाळाराम देहू म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही तिचे विद्यमान मालक **श्री.वेलेरियन जीगुल** रा.पोतदार रोड, सांताक्रुझ वेस्ट मुंबई, यांची संपूर्ण मालकीची व ताबे-वहिवाटीची असून ही मिळकत त्यांनी आमचे अशिल यांना विक्री करण्याचे मान्य व कबुल केलेले असून सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा देवून सदर मिळकतीची बोलणी चालू आहेत. तथापी सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही, गहाण, दान, लीन, लीज, बक्षिस, भाडेपट्टा, करारमदार, खरेदीविक्री, विसापावती, साठेखत, कुलमुखत्यार, विकसनकरार, कोर्ट कचेरी इ. प्रकारचा व अन्य कोणत्याही प्राकरचा हक्क, अधिकार, हितसंबंध व बोजा असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत आमचे अशिलांची कागदपत्रानिशी, पुराव्यानिशी खालील पत्यावर खात्री करून द्यावी व तशी पोहोच घ्यावी. सदरच्या मुदतीत कोणीही हरकत व तक्रार न नोंदविल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध वा अधिकार नाही असे समजून व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला दिलेला आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर कोणत्याही वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करून घेतलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन : तुकडी रायगड, पोट तुकडी, तालुका पनवेल, मा.दुय्यम निबंधक साहेब, पनवेल यांच्या कार्यकक्षेतील तसेच जिल्हा परिषद रायगड व तालुका पंचायत समिती पनवेल यांचे हद्दीतील, ग्रामपंचायत व गाव मौजे चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत यांसी ग.नं.८७/३ यासी क्षेत्र ०० हे. ४२ आर + पोटखराबा ०० हे. ०३ आर यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ४५ आर यांसी आकार ०८ रु. ७५ पै. ही मिळकत यांसी चतु:सिमा :- गाव नकाशाप्रमाणे.**

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पुणे
दि.२२/१०/२०२१

**सही/-**
**ॲड.मानस म. ठाकोर**
**ऑफिस नं.२०१, विद्याधर हाईट,**
**२४३, नारायण पेठ, पुणे-३०**
**फोन नं.०२०-४१२६१५८४**

---

अर्जदाराचे वकील
ॲड.मच्छिंद्रनाथ आत्माराम घरत

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/१२/२०२१

१) श्री.देवानंद पांडुरंग ठाकूर
वय : ६० वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्री.परशुराम पांडुरंग ठाकूर
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.लिलेश्वर पांडुरंग ठाकूर
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
४) श्री.विकास पांडुरंग ठाकूर
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
५) श्री.प्रभाकर पांडुरंग ठाकूर
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
६) श्री.जयवंत पांडुरंग ठाकूर
वय : ५० वर्षे, व्यवसाय : नोकरी
७) श्री.कृष्णा पांडुरंग ठाकूर
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
८) श्री.नवनाथ पांडुरंग ठाकूर
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
वरील अर्जदार क्र.१ ते ८ रा.भेंडखळ,
पो.जेएनपीटी, ता.उरण, जि.रायगड-४००७०२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. पांडुरंग काशिनाथ ठाकूर यांचे निधन रा.मु.पो.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै.पांडुरंग काशिनाथ ठाकूर यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.पांडुरंग काशिनाथ ठाकूर यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव / युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | हिस्सा नं. |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : भेंडखळ ९८/९२ | ३११ | ४ | ०-१२-८ |
| | | ३११ | २ | ०-२५-४ |
| | | २७० | ६ | ०-०८-१२ |
| | | २६५ | ३ | ०-०४-१२ |
| | | २६० | १ | ०-०४-४ |
| | | २४५ | ५ | ०-१०-४ |
| | | ३०८ | १ | ०-०७-४ |
| २ | मौजे : भेंडखळ ९८ (२)/८३ | ३१० | १ ब | ०-१५-८ |
| ३ | मौजे : भेंडखळ ७८/८३ | १३७ | १ PT | ०-०८-० |
| ४ | मौजे : भेंडखळ २३०/८३-८४ | १३८ | १ | ०-२०-४ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ८ हे कै.पांडुरंग काशिनाथ ठाकूर यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२२/१०/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

---

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०६/१२/२०२१

(कै.दामोदर दशरथ तांडेल यांचे कायदेशीर वारस)
१) श्री.पंकज दामोदर तांडेल (मुलगा)
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
आधार कार्ड नं.२९४४१८४१०५४७
२) श्रीमती.प्रमिला दामोदर तांडेल (पत्नी)
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
आधार कार्ड नं.३८६५५२०४०३१५
३) सौ.प्रिती महेंद्र ठाकूर (मुलगी)
उर्फ प्रिती दामोदर तांडेल (लग्नाआधीचे नाव)
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.खोपटे, ता.उरण, जि.रायगड
आधार कार्ड नं.५६६६२३२१३७३८
४) सौ.प्रतिक्षा ज्ञानेश्वर पाटील (मुलगी)
उर्फ प्रतिक्षा दामोदर तांडेल (लग्नाआधीचे नाव)
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रावे, ता.पेण, जि.रायगड
आधार कार्ड नं.८३३३७०३३७०६१
५) सौ.प्रगती दामोदर तांडेल (मुलगी)
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
आधार कार्ड नं.८२६२८७१३०६२३ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की,

**अ) मौजे : पागोटे, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र अे.गु.आ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पागोटे | ३९ | ४ | ००-०६-० | २०१ |
| २ | पागोटे | ८४ | ३ | ००-१२-८ | २०१ |

**ब) मौजे : पागोटे, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र अे.गु.आ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पागोटे | २१ | ३ | ००-१७-८ | २५३ |
| २ | पागोटे | ८६ | ३ | ००-१६-४ | २५३ |
| ३ | पागोटे | ११३ | १ | ००-१३-० | २५३ |
| ४ | पागोटे | १२० | ४ | ००-१०-४ | २५३ |
| ५ | पागोटे | १२५ | ६ | ००-१०-० | २५३ |

**क) मौजे : पागोटे, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र अे.गु.आ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पागोटे | ३६ | ५ अे | ००-०८-८ | ५९ |
| २ | पागोटे | ६३ | ९ | ००-१२-८ | ५९ |
| ३ | पागोटे | १२७ | १ | ००-०६-८ | ५९ |
| ४ | पागोटे | ८२ | ७ | ००-०५-४ | ५९ |

**ड) मौजे : पागोटे, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र अे.गु.आ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पागोटे | ६९ | २ | ००-११-८ | १५२ |
| २ | पागोटे | ७० | ७ | ००-०९-९ | १५२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.दामोदर दशरथ तांडेल यांच्या हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : उरण
दिनांक : २०/१०/२०२१

सही/- क.लिपीक दि. व फौ.न्याया, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि. व फौ.न्याया, उरण

---

मे.मुजावर साो. यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
ॲड.शशिकांत द. ढवळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४५८/२०२१
नि.नं.८
ने.ता.२९/११/२०२१

१) श्रीमती.शकुंतला राजाराम पवार व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ चे पती आणि अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील कै.राजाराम आंबा उर्फ आंबो पवार हे दि.०३/०९/२०२० रोजी त्यांच्या राहते घरी कोपरा या गावी मयत झालेले असून त्यांची आई कै.आंबी आंबा पवार उर्फ आंबीबाई आंबो पवार ह्या देखील दि.२३/०३/१९८३ रोजी मौजे : कोपरा येथे मयत झालेल्या आहेत.

त्याचप्रमाणे कै.राजाराम आंबा उर्फ आंबो पवार यांचे मृत्यूपश्चात त्यांना हिंदू वारसा अधिनियमाप्रमाणे अर्जदार क्र.१) शकुंतला राजाराम पवार (पत्नी), २) उदय राजाराम पवार (मुलगा), अनु क्र.१ व २ दोघेही रा.साई सिद्धी हॉटेल जवळ, घर नं.२७२, मु.कोपरा, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ३) रेखा प्रकाश पाटील (मुलगी) मु.पो.वावंजे, मधली आळी, ता.पनवेल, जि.रायगड ४) अलका विजय पालेकर (मुलगी), रा.मु.वळवली, घर नं.१२८, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड ५) कविता कुंदन नाईक (मुलगी) राहणार : घर नं.१५७, श्री साफल्य निवास, सौरभ बेकरी जवळ, सेक्टर नं.१३, दारावे गाव, नेरुळ, नवी मुंबई, ता.जि.ठाणे हेच प्रथम श्रेणीतील कायदेशीर वारस असून या अर्जदारांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही मुले अथवा मुली वारस नव्हते व नाहीत.

कै.राजाराम आंबा उर्फ आंबो पवार यांचे वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या, वारसाहक्काच्या तसेच ताबेकब्जा, वहिवाट व कसवणुकीच्या मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेप्रमाणे शेतजमीन मिळकती होत्या. सदर मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको प्रशासनाने संपादीत केलेल्या आहेत.

**परिशिष्ट 'अ'**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | संपादीत क्षेत्र हे.आर.पॉ. | संपादीत न झालेले ७/१२ वरील क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| खारघर | २० | २०७ | १ | ०-१४-२ | - |
| | | १५५ | ३१ | ०-०५-८ | - |
| खारघर | २० A | ३४१ | ८ | ०-५५-० | - |
| | | ११८ | ५ | ०-०६-१ | - |
| | | ११७ | ४ | ०-१९-६ | - |
| | | ११७ | ३ | ०-०३-० | - |
| खारघर | २१ D | १५९ | ४ | ०-१३-६ | - |
| सर्व्हे/हिस्सा नं.१५९/४ या शेतजमीन मिळकतीचे पोटखराब्यासहीत एकूण ०-५६-० हे.आर.पॉ. पैकी संपादीत क्षेत्र वगळून शिल्लक राहिलेले पोटखराब्यासहीत एकूण क्षेत्र | | | | | ०-४२-४ |

तसेच कै.राजाराम आंबा उर्फ आंबो पवार यांचे स्वतःचे मालकी हक्क व ताबेकब्जातील पनवेल महानगरपालिकेच्या (गाव/विभाग : खारघर) असेसमेंट सदरी नोंद असलेली घर मिळकत असून सदर घर मिळकतीचे वर्णन खालील परिशिष्ट 'ब' मध्ये केले आहे.

**परिशिष्ट 'ब'**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | सिटी सर्व्हे नं. | मालमत्ता / घर मिळकत क्र. | मालकाचे / भोगवटा दाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ चौ.फुट/ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| खारघर | १० | ९८५ | राजाराम आंबा पवार | भिंती पत्रे तळघर | २००० |

कै.राजाराम आंबा उर्फ आंबो पवार यांचे मालकी व ताबेकब्जातील वरील प्रमाणे नमूद केलेल्या परिशिष्ट 'अ' आणि परिशिष्ट 'ब' मधील मिळकतींबाबत वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार क्र.१ ते ५ यांनी दिवाणी चौकशी अर्ज क्र.१४५८/२०२१ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत अर्जदार हे कै.राजाराम आंबा उर्फ आंबो पवार यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार क्र.१ ते ५ यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २२/१०/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## शिवसेनेच्या दणक्यानंतर पथदिवे सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमध्ये अनेक ठिकाणी रस्त्यावरचे पथदिवे बंदावस्थेत होते. या संदर्भात शिवसेनेने सिडकोला दणका दिल्यानंतर पुन्हा पथदिवे सुरू झाल्याने परिसर उजळला आहे.

जिल्हाप्रमुख शिरीष घरत व महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली आणि विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर व शहर प्रमुख डी.एन.मिश्रा व उपमहानगर समन्वयक आत्माराम गावंड यांच्या मार्गदर्शनाने कळंबोली शहर समन्वयक गिरीष धुमाळ व विभाग प्रमुख आकाश शेलार, दिपक कोडवते तर्फे सिडकोकडे बंद पथदिवे सुरू करण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते.

त्या निवेदनाची तात्काळ दखल घेत सिडको अभियता यांने सेक्टर १, २ई, ३ई, ४ई, ६, १० येथील रस्त्याच्या पथदिव्याची दुरुस्ती पूर्ण करून घेतले व त्यावेळी उपस्थित स्थानिक रहिवाश्यांनी कळंबोली शिवसेनेचे व शहर समन्वयक गिरीश धुमाळ आणि पदाधिकारी यांचे आभार मानले. त्या प्रसंगी दीपक कोडवते, शिवकुमार यादव ऊर्फ (राजू ), सुमित सूर्यवंशी, तेजस धादवड, विष्णू दडस शिवसैनिक उपस्थित होते.

तसेच मागणी नुसार कामाला सुरुवात केल्याबद्दल कळंबोली शिवसेने तर्फे सिडको अभियंता कांबळे व अनिल मेटकरी, जगदीश शेळके, यांचे आभार मानले.

## डॉ. विठोबा मरवडे यांच्या परिवाराला रू.२ लाखाचा धनादेश प्रदान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे पं.समितीचे सेवानिवृत्त पशूधन विकास अधिकारी डॉ.विठोबा धोंडू मरवडे यांचे कोरोना महामारी कालावधीत कोरोना प्रादुर्भावामुळे दु:खद निधन झाले.त्यांच्या पश्चात परिवाराला एक मदतीचा हात पुढे करीत मँनकिंड कंपनीकडून रू.२ लाखाचा धनादेश सपूर्द करण्यात आला आहे.

रोहे पं.समिती कार्यालयात मँनकिंड कंपनीचे व्यवस्थापक मंडळाकडून त्यांच्या परिवाराला सदरचा धनादेश सपुर्द करण्यात आला आहे. यावेळ मॅनकिंड कंपनी चे महाराष्ट्र हेड संग्राम मोहिते, कोंकण हेड पप्पू शहाणी,कदम,डॉ. घुगे,डॉ. जोशी,डॉ. पाटील,गांगल मेडिकल-रोहाचे संदीप गांगल, डॉ. शहा, डॉ. गुरव, डॉ. धुमाळ,रघुनाथ करंजे गुरुजी आदी उपस्थित होते.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# नेरळ बाजारपेठ पुन्हा अतिक्रमणाच्या विळख्यात

## दोनदा अतिक्रमण जमीनदोस्त करून देखील अतिक्रमणे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

मध्य रेल्वे मेन लाईन वरील नेरळ रेल्वे स्थानकाच्या बाहेर असलेल्या बाजारपेठेत रस्त्यावर केलेले अतिक्रमणे आतापर्यंत दोन-वेळा जमीनदोस्त करण्यात आली होती. मात्र अतिक्रमणे करून रस्त्यावर दुकाने थाटणारे यांना कोणतेही भय राहिले नाही आणि त्यामुळे आता तिसऱ्यांदा रस्त्यावर अतिकारणे झाली आहेत. दरम्यान, रस्त्याची मालकी असलेले रायगड जिल्हा परिषद आणि ताबा असलेल्या नेरळ ग्रामपंचायतीचे कोणतेही नियंत्रण नाही असे दिसून येत आहे.



नेरळ रेल्वे स्टेशन जवळ असलेल्या बाजारपेठेची निर्मिती रेल्वे मार्गाच्या बाजूला रस्त्यावर आणि गटाराच्या वर बांधली होती. नेरळ मधील सामाजिक कार्यकर्ते माधव गायकवाड यांनी मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केल्यावर जानेवारी २००८ मध्ये नेरळ बाजारपेठ मधील रस्त्यावर अतिक्रमण सार्वजनिक बांधकाम खात्याने जमीनदोस्त केली होती. त्यानंतर बांधकाम विभागाने तेथे गटारे बांधण्याचे काम वर्षभर केले नाही आणि त्यामुळे त्या रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण करून दुकाने थाटली गेली. जिल्हा परिषद सदस्य सुरेश टोकरे हे अध्यक्ष बनल्यानंतर त्यांनी नेरळ गावातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकस प्राधिकरण कडून निधी मंजूर करून आणला. त्या २३ कोटींच्या निधीमधून नेरळ बाजारपेठ मधील रस्त्यांची कामे करण्यासाठी पुन्हा एकदा डिसेंबर २०१७ मध्ये नेरळ रेल्वे स्टेशन जवळील बाजारपेठ मधील अतिक्रमणे नेरळ ग्रामपंचायतीकडून तोडण्यात आली.

दीड वर्षे रस्त्याचे काम चालले आणि नेरळ बाजारपेठेतील रस्ता सिमेंट काँक्रीटचा बनला, सोबत रस्त्याच्या बाजूला बांधलेल्या गटारांवर पेव्हर ब्लॉक बसवून फुटपाथ देखील तयार करण्यात आला. हीच संधी साधत नेरळ बाजारपेठेत लोकांना चालण्यासाठी बनविण्यात आलेले फुटपाथ दुकानदार यांच्यासाठी आपली दुकाने थाटण्याचे ठिकाण बनले आहे. नेरळ रेल्वे स्टेशन पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत एका बाजूला १०० टक्के फुटपाथ व्यवसायिकांनी व्यापला आहे. तर समोरील अर्धा फुटपाथ देखील अतिक्रमणं करून गिळला आहे. त्या अतिक्रमण करणाऱ्या दुकानदार आणि व्यवसायिक यांना कोणतेही भय राहिले नसून नेरळ ग्रामपंचायतीचे अधिकार असून देखील झालेले अतिकारण काढण्यासाठी कोणीही पुढे येताना दिसत नाही.

त्यात आता सर्व दुकानदारांनी रस्त्याच्या फुटपाथ वर अतिक्रमण करतानाच त्या ठिकाणी प्लास्टिकचे शेड देखील बांधले आहेत. त्यात केवळ नेरळ येथील नाही तर मुरबाड, अंबरठा तालुक्यातील व्यवसायीक रस्त्यावर अतिक्रमण करून व्यवसाय करीत आहेत. हे अतिक्रमणे दूर व्हावेत यासाठी अनेकदा नेरळ संघर्ष समितीने उपोषणे देखील केली आहेत, पण त्याचे ना भय अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्यांना आणि ना काळजी नेरळ ग्रामपंचायतीला अशी नेरळ मधील रस्त्याची झाली आहे.

# परेश ठाकूर यांच्यामार्फत उड्डाण पुलावरील खड्ड्यांची पुन्हा दुरुस्ती



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मधील तिर्थरुप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. एमएसआरडीसी विभागास पुलावर पडलेल्या खड्ड्यांचे काम करण्यास सांगितले होते. मात्र त्यांच्या कडून सदर कामात दिरगांई होत होती. सदर उड्डाणपुलावरून प्रवास करणाऱ्या नागरीकांच्या सुरक्षितेच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ऑगस्ट महिन्यात स्व खर्चाने या उड्डाणपुलावरील सर्व खड्ड्यांची दुरुस्ती केली.

या पुलावर वाहनांची सतत वाहतूकीमुळे पुन्हा तिर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावर खड्डे पडल्याचे दिसुन आले आहे. याकारणास्तव सभागृहनेते परेश ठाकूर यांच्यामार्फत सदर उड्डाण पुल-ावरील खड्डे पुन्हा दुरुस्ती करून देण्यात आले असून त्यांच्यामुळे वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# क्लिन इंडिया अभियानांतर्गत वडखळ येथे प्लास्टिक कचरा संकलन मोहीम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

क्लिन इंडिया अभियानांतर्गत नेहरू युवा केंद्र, अलिबाग-रायगड, जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभाग, पेण तालुक्यातील ग्रामपंचायत वडखळ, रूरल अँड यंग फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक कचरा संकलन मोहीम काल (दि.२१ ऑक्टोबर) रोजी राबविण्यात आली.




नेहरू युवा केंद्राचे स्वयंसेवक परेश म्हात्रे, पूजा खाडे, स्वयंसेवी संस्थांचे २० सदस्य आणि वडखळ पंचायतीचे सरपंच श्री. मोकल, उपसरपंच, महिला प्रतिनिधी, कर्मचारी वृंद, प्रदीप म्हात्रे, सखाराम भगत, समिक्षा मलव, ग्रामसेवक श्री. धोत्रे या सर्वांनी सकाळी ८ ते १० या वेळेत वडखळ बस स्थानक, ग्रामपंचायत परिसर, पेट्रोल पंप परिसर, महामार्गावरील सर्व दुकाने आणि बाजारपेठ या परिसरातील जवळ जवळ ८५० किलो फक्त प्लास्टिक कचरा गोळा करून जे.एस. डब्ल्यू कंपनीच्या वाशी येथील पुनर्निर्माण केंद्रावर पंचायतीच्या गाडीने पाठविला. यासाठी जे.एस.डब्ल्यू कंपनीचे सामाजिक कार्य अधिकारी रसिक काळे आणि किरण म्हात्रे यांनी मोलाचे सहकार्य केले.

यावेळी नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी श्री.निशांत रौतेला, जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभागाचे जिल्हा समन्वयक श्री.जयवंत गायकवाड, रूरल अँड यंग फौंडेशनचे अध्यक्ष कमलेश ठाकूर हे या मोहिमेत सहभागी झाले होते.

या प्रसंगी श्री.जयवंत गायकवाड यांनी आपल्या मनोगतात वडखळ पंचायतीच्या या उपक्रमातून एक दार आठवड्याला एक दिवस प्लास्टिक कचरा संकलन ही संकल्पना राबविण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर विविध बचतगट, संस्था, युवा मंडळांचा सहभाग वाढावा म्हणून वार्षिक कॅलेंडर च्या माध्यमातून नियोजनाची नावीन्यपूर्ण संकल्पना राबविण्याची तसेच प्लास्टिकमुक्त पंचायतीकडे वाटचाल कशी करता येईल, यासाठी उपाययोजना राबविणे गरजेचे आहे, असे विचार मांडले.

हा उपक्रम प्रत्यक्ष राबविताना स्वतः सरपंच संस्थेच्या प्रतिनिधींबरोबर सर्व व्यापारी वर्गाला मेगा फोन वरून प्लास्टिक कचरा गोळा करण्याचे आवाहन करीत होते. त्याचबरोबर ते स्वत:ही स्वयंसेवकांबरोबर खांद्याला खांदा लावून कचरा गोळा करताना दिसले. यात पंचायतीच्या सर्व महिला प्रतिनिधींनी देखील पुढाकार घेतला.

# उरण तालुका स्तरीय किल्ले स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार व कार्याचा प्रसार, प्रचार करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे उरण तालुका मर्यादित भव्य असे किल्ले स्पर्धा २०२१ चे आयोजन करण्यात आले आहे.श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराची, कार्याची ओळख व्हावी, गड किल्ले यांच्याविषयी समाजात आवड निर्माण व्हावी. गड किल्लयाचे संवर्धन संरक्षण व्हावे, श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सर्वांसमोर आणण्यासाठी हे गड किल्ले स्पर्धा घेण्यात येत आहे. दिवाळी दरम्यान बनविलेले गड किल्ले यांची संपूर्ण माहिती, फोटो , किल्ला बनविणाऱ्या बालकांची नावे किंवा ग्रुपचे नाव, संपर्क क्रमांक आदी माहिती संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील - ८०९७१०००७३, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे व्हाट्सअप नंबर ९७०२७५१०९८ यांच्या व्हाट्सअप वर पाठवावे.

श्री.मुजावर सो.कोर्ट

अॅड.संजय पाटकर
अॅड.वैशाली सुळेभाविकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६१५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/११/२०२१

१) श्रीमती.अनिता भिकाजी गोरे
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.स्वप्नील भिकाजी गोरे
वय : २५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) रोहन भिकाजी गोरे
वय : २१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्व रा.श्री.बालाजी हौ.सो., प्लॉट नं.७३ अ,
सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई
४) कु.सोनल भिकाजी गोरे
सौ.सोनल अनिरुद्ध पाटील ५२०/सी-३३,
गोदावरी हौ.सोसायटी, सेक्टर ५,
चारकोप कांदिवली वेस्ट, मुंबई — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील श्री.भिकाजी जोतिबा गोरे, रा.फ्लॅट नं.सि ३०१, श्री. बालाजी को.ऑप. हौ.सो., प्लॉट नं.७३ ए, सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई ४१०२१० हे दि.१४/०१/०२१ रोजी निधन झाले. त्यांना अर्जदार हेच वारस आहेत. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :

**मौजे : खारघर येथील सदनिका नं.सि ३०१,
श्री बालाजी को.ऑप.हौ.सोसायटी, तिसरा मजला,
प्लॉट नं.७३ ए, सेक्टर नं.११, मौजे : खारघर, नवी मुंबई**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत अशी कोणाची हरकत असल्यास आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर होवून तक्रार दाखल करावी. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून जाहीर करतील व वारस दाखला देईल.

आज दि.२१ माहे १० सन २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे मॅडम

प्रो.जमा. ६-२५

अर्जदाराचे वकील
अॅड.निलम मुंगाजी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१४६३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१/१२/२०२१

१) श्रीमती.फुलाबाई दिनकर सावंत (आई)
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.१०१/१७/डी, संघर्ष नगर, चांदवली फर्म रोड,
अंधेरी (ईस्ट), मुंबई ४०००७२
२) श्रीमती.उज्वला सुधीर सावंत (पत्नी)
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
३) कु.दिवेश सुधीर सावंत (मुलगा)
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
४) श्रेया सुधीर सावंत (मुलगी)
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
अर्जदार क्रं.३ व ४ साठी अज्ञानपालनकर्ती
म्हणून आई उज्वला सुधीर सावंत
अर्जदार क्र.२ ते ४ सर्व रा.रुम नं.३७,
गोरा गांधी बिल्डींग, तिसरा मजला संत सेना महाराज
मार्ग, दुसरा कुंभारवाडा, गिरगाव, मुंबई ४००००४ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.सुधीर दिनकर सावंत हे दि.१३/०६/२०२१ रोजी रा.सायली, पो.दहिवड, ता.जि.सातारा येथे मयत झाले आहेत. त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील फ्लॅट नं.०२०४, बिल्डींग नं.एल १३, दुसरा मजला, सेक्टर ४०, क्षेत्र २९.८२ चौरस मीटर कारपेट क्षेत्र**

कै.सुधीर दिनकर सावंत यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल**

महाराष्ट्र शासन

**निविदा सुचना क्र.१३ सन २०२१-२०२२**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग**
**(फेर निविदा)**

खालील कामाच्या बी-१ निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अलिबाग दुरध्वनी क्रमांक २२२०८४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत (पंजीकृत) कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,अलिबाग यांच्या संकेत स्थळावर **दिनांक २२/१०/२०२१ ते २८/१०/२०२१ पर्यंत १०:०० ते १८:०० वाजेपर्यंत ऑनलाई (www.mahapwd.com)** वर उपलब्ध आहे. कार्यकारी अभियंता हे ठेकेदाराने भरुन पाठविलेल्या **सिलबंद निविदा ऑफलाईन पद्धतीने** दिनांक २९/१०/२०२१ रोजी स. १०:०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि दि. २९/१०/२०२१ रोजी सकाळी दु. ३.०१ वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसाऱ्याची रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी महिने | निविदेच्या नमुन्याचा प्रकार कोऱ्या निविदा नमुन्यांची किमत (रुपये) | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुरुड तालुक्यातील बोर्डी ठाणे उलवा रेवस रेड्डी प्ररामा ४ किमी ० येथील चिकणी पुलाच्या पोचमार्गाच्या भरावाची पुन:स्थापणा व पूलाची दुरुस्ती करणे.ता. मुरुड , जि. रायगड . | ७५६३५६.०० | ८०००/- | ५६०/- | १५ दिवस | वर्ग सात व वरील |
| २ | मुरुड तालुक्यातील मुरुड शिघ्रे केळघर रस्ता प्रजीमा-५३ किमी ३/९०० ते ४ /००० येथील दरड काढणे .ता. मुरुड , जि. रायगड . | ४८६५१९.०० | ५०००/- | ५६०/- | १५ दिवस | वर्ग आठ व वरील |
| ३ | मुरुड तालुक्यातील मुरुड एकदरा राजपुरी खोकरी रस्ता प्रजीमा -५५ किमी ३/९०० ते ४/१५० येथील दरड काढणे .ता. मुरुड , जि. रायगड . | ७५०६२८.०० | ८०००/- | ५६०/- | १५ दिवस | वर्ग सात व वरील |
| ४ | मुरुड तालुक्यातील बोर्डी ठाणे उलवा रेवस रेड्डी प्ररामा ४ किमी २७२/१३० ते २७२/१८० येथील विहूर पुलाच्या पोचमार्गाच्या भरावाची पुन:स्थापणा दुरुस्ती करणे .ता. मुरुड , जि. रायगड . | ८८५८९२.०० | ९०००/- | ५६०/- | १५ दिवस | वर्ग सात व वरील |

टीप : १) तपशिलवार निविदा सुचना कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल. तसेच कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामूल्य मिळू शकेल.
२) कोरी निविदा संच विक्री **https//www.mahapwd.com** या संकेत स्थळावर ऑनलाई उपलब्ध आहे.
३) इतर अटी व शर्ती निविदा नमुन्या मध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची बी-१-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
४) सर्व पात्र / इच्छुक निविदा कारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https//www.mahapwd.com या Portal वर enrolled करणे आवश्यक आहे.

(श्री.ज.ई. सुखदेवे)
कार्यकारी अभियंता
अलिबाग (सा.बां.) विभाग,
अलिबाग

जा.क्र. : अवि/लेशा/निविदा/ ५४६९ /२०२१
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग
दिनांक :- २१/१०/२०२१